# जाहीर प्रकटन

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मा. कुलगुरू यांचा कॅफेमधील एका व्यक्तीसोबतचा फोटो समाजमाध्यमांमध्ये व्हायरल झाल्याचे आणि त्या अनुषंगाने काही बातम्या व तर्क–वितर्क माध्यमांमध्ये होत असल्याची बाब विद्यापीठाच्या निदर्शनास आलेली आहे.

मा. कुलगुरू समाजातील विविध घटकांना कामकाजानिमित्त तसेच सामाजिक औचित्यातून नेहमीच भेटत असतात. कार्यालयीन कामकाजानिमित्त बाहेर असताना त्यांची संबंधित फोटोत असलेल्या व्यक्तीसोबत अनौपचारिक भेट झाली. सदर व्यक्ती एका उद्योगसमूहाचे प्रतिनिधी असून त्यांचा सहभाग असलेली खरेदी प्रक्रिया तांत्रिक व प्रक्रियात्मक बाबींमुळे विद्यापीठाने यापूर्वीच रद्द केलेली आहे. त्यामुळे सदर फोटोचा दुरान्वयानेही विद्यापीठाच्या आर्थिक बाबींशी संबंध असल्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

सदर फोटोचा विपर्यास करून समाजमाध्यम आणि प्रसारमाध्यमांतून विद्यापीठाची बदनामी करणाऱ्यांविरूध्द विद्यापीठ कायदेशीर कारवाईची प्रक्रिया करीत आहे.

तसेच विद्यापीठास प्राप्त झालेल्या निधीचा विहित कालावधीत विनियोग करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या निविदा/फेरनिविदा विद्यापीठ करीत आहे.

आदेशावरून,

जनसंपर्क अधिकारी,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दिनांक : २४/०९/२०२६
ठिकाण : पुणे